## निशाणी क्र. १२ खालील आदेश

**१.** सामनेवाला क्र. ४ हिने प्रस्तूतचा अर्ज तिच्या विरूद्ध झालेला ''एकतर्फा'' आदेश रद्द होवून तिचे म्हणणे स्विकारण्यासाठी अभिलेखावर दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील सामनेवालाचे कथनानुसार सामनेवाला क्र. ४ हिची नात-सुन ही सासरी राहत असल्याने व प्रकरण संपल्याचे सांगितले असल्याने, तसेच नोटीस आली त्यावेळी मुलीकडे आलेली असल्यामुळे, प्रस्तुत सामनेवालास न्यायालयात हजर राहता आलेले नाही. म्हणून, न्यायालयाने दिनांक १५.०२.२०२४ रोजी प्रस्तुत सामनेवलाविरूध्द एकतर्फा आदेश निशाणी क्र. ०१ वर पारित केलेला आहे. सामनेवाला हिने मुद्दामहून अथवा हेतुपुरस्पर विलंब केलेला नसून सामनेवाला हिस म्हणने देवून बचाव मांडण्याची संधी देणे गरजेचे असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जास अर्जदाराने आपले म्हणणे दिलेले असून सदरचा अर्ज खरा व बरोबर नसून न्यायालयात हजर न राहण्याचे कारण योग्य व संयुक्तीक नसून, सदरचा अर्ज नामंजुर करण्याचे कथन केलेले आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वरील सानमेवालाने विहित वेळेमध्य हजर होवुन तिचे म्हणणे दाखल केले नसल्याने नि. क्र. १ वरील दिनांक १५.०२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार तिच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आलेला आहे. प्रकरणाचे स्वरूप व प्रस्तूत अर्जातील तथ्य विचारात घेता तसेच, नैसर्गिक न्याय तत्वानुसार उभय पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. तसेच, प्रकरणाचा निकाल गुणवत्तेवर लागण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजुर करून सामनेवाला हिला तिचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य व उचित होईल. तथापी, सामनेवाला याने तिचे म्हणणे वेळेमध्ये दाखल न केल्याने प्रस्तूत प्रकरण पुढे चालविण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य व न्यायोचित होईल. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## -: **आदेश** :-

**१.** सामनेवालाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** सामनेवाला क्र. ४ हिच्या विरूद्‍ध झालेला ‘‘एकतर्फा’’ आदेश रक्कम रू. २००/- चा दंड अर्जदारास देण्याच्या अटीवर रद्‍द करणेत येतो व तिने प्रस्तुत प्रकरणात तिचे म्हणणे आज अथवा पुढील तारखेला दाखल करावे.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2024.07.16 17:57:01 +0630

दिनांक : १५/०७/२०२४

( व्ही. व्ही. जोशी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग जामखेड.